International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-13 May- June 2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-June Volume-2 Issue-13*

*On*

Chief Editor
P. R. Talekar
Secretary
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

Editor
Dr. Qamrunnisa Begum Ikramoddin Shaikh
I/C Principal,
Kohinoor Arts, Commerce & Science College, Khultabad
Tq. Khultabad Dist. Aurangabad

Co- Editors

Dr. M. P. Wanjari | Smt. S.B. Rengunthwar | Dr. M. L. Hiwale
Dr. Rafiullah Khan | Dr. Shaikh Moh.Arif Yasin

*Published by- Young Researcher Association, Kolhapur (M.S), India*

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

| | | |
|---|---|---|
| 24 | Antimicrobial activity of Black Pepper against some pathogenic bacteria<br>**Dr. Surve Sushma Prarashram, Mr. Ganesh B. Labade** | 92-96 |
| 25 | Investigation of Phytochemical Analysis of Eight Medicinal Plants From Wardha District. Maharashtra, India<br>**Jadhao Ajay. B. and Kshirsagar A.A** | 97-98 |
| 26 | Physical Evidence of Vertical and Horizontal Vesicular Cylinders In Imampur Ghat Section In Ahmadnagar District<br>**Dr. Prashant.U. Terker** | 99-104 |
| 27 | Limnological Characterstics of Triveni Lake in Amravati District of Maharashtra<br>**Rafiullah M. Khan** | 105-108 |
| 28 | Hardware Trojan Detection System for Smart City network: HTDS<br>**Mohd khizar Syed, Dr. Chishty S.Q,Pathan Naim Nadeem** | 109-113 |
| 29 | **Future Wonder Foods**<br>**Dr. Archana A. Nikhade** | 114-117 |
| 30 | साहित्यातुन दिसणारे कृषी जीवन (विशेष संदर्भ : कथाकार प्रा.माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' व 'ताडमं' कथासंग्रह<br>श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव | 118-119 |
| 31 | भात लागवडीच्या सुधारित पद्धतीचा भौगोलिक अभ्यास<br>सहा .प्रा.नंदकिशोर आत्माराम पाटील, डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर | 120-122 |
| 32 | बोळेगाव या गावातील कुटूंबनियोजनाचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा.बिचकुंदे शशिकांत संग्राम | 123-127 |
| 33 | पर्यावरण जागरूकता में जल संरक्षण और प्रदूषण पर वैदिक चिंतन<br>सुदीप्त कुमार करण | 128-131 |
| 34 | मानार खोऱ्यातील ग्रामीण वसाहतीचे वितरण : एक भौगोलिक विश्लेषण<br>भवानकर गजानन गंगाधरराव, डॉ.भागवत नामदेवराव पस्तापूरे | 132-135 |
| 35 | गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांच्या अंतराचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे | 136-138 |
| 36 | भारतीय अर्थव्यवस्था आणि सेवा क्षेत्राचा सहभाग<br>डॉ. रहाणे शोभा तुकाराम | 139-142 |
| 37 | नैसर्गिक साधनसंपदेचे संवर्धन<br>बोईवारे ब्रम्हानंद माधवराव, प्रा. डॉ. एन.के. वाघमारे | 143-145 |
| 38 | कृषि अर्थव्यवस्था पर नहर के जल के प्रभाव का तुलनात्मक अध्ययन<br>आरसी प्रसाद झा | 146-148 |
| 39 | पेयजल शुद्धीकरण पद्धती<br>डॉ. मगर एस. आर | 149-151 |
| 40 | अनाथ विवाहित व्यक्तींची वैयक्तिक वाढ आणि जीवन उद्देशाचा तुलनात्मक अभ्यास<br>शितल भागवत जाधव, डॉ.रमेश पठारे | 152-155 |
| 41 | प्रेमचंद की कहानियों में मानव चेतना<br>डॉ. सुभाष सोनाजी जिते | 156-158 |
| 42 | आधुनिक हिंदी कविता में काव्य चिंतन<br>डॉ. प्रमोद पाटील, स.प्रा.प्रकाश आनंदा लहाने | 159-160 |
| 43 | जागतिक तापमान वाढः एक समस्या<br>अवसरमोल एस.बी. | 161-162 |
| 44 | शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा उपयोग<br>स.प्रा. मोरे तुकाराम सुर्यभानराव | 163-165 |
| 45 | ग्राम विकास व कृषि में महिलाओं की भूमिका<br>डॉ० पारूल शर्मा डॉ० अवनीश शर्मा | 166-170 |
| 46 | पर्यावरणवादी इतिहास लेखन: एक अभ्यास<br>सहा,प्रा.सौ.नंदिनी देशमुख, डॉ.शशिकांत गोकुळ साबळे | 171-175 |




Scanned with CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2Issue-13May-Jun2022

# पर्यावरणवादी इतिहास लेखन: एक अभ्यास

सहा,प्रा.सौ.नंदिनी देशमुख[1] डॉ.शशिकांत गोकुळ साबळे[2]
[1]आर.एन.सी.आर्ट्स,जे.डी.बी.कॉम. एन.एस.सी.सायन्स कॉलेज नाशिकरोड, नाशिक
[2]आर.एन.सी.आर्ट्स,जे.डी.बी.कॉम. एन.एस.सी.सायन्स कॉलेज नाशिकरोड, नाशिक
Email: nandinibdeshmukh.24@gmail.com
Email-sabale.uma@gmail.com

घोषवारा :

नैसर्गिक आपत्तीमुळे मानवी जीवन त्याचबरोबर जीवनमूल्ये स्थावर संपत्ती आणि सामाजिक नियमांचे देखील हानी होते. त्यामुळे पर्यावरण वादी इतिहासात एक नवीन दृष्टी ने आपण निसर्गाला, राज्याकडे व समाजाकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहू शकतो. इतिहास ही जरी स्वतंत्र ज्ञानशाखा असली तरी इतिहास लेखन करताना अनेक सामाजिक व शास्त्रीय शाखेचा संबंध येतो. इतिहासाच्या अभ्यासात भूगोल या ज्ञान शाखेची महत्त्वाची भूमिका आहे.स्थळ व काळ ही इतिहासाची प्रमुख परिणामे आहेत. नैसर्गिक स्थिती पर्वत, नद्या, हवामान, जंगले, समुद्र इत्यादी घटक मानवी जीवनाचे स्वरूप बदलतात.इतिहास लेखनातील नवीन विचार प्रवाह म्हणजे पर्यावरणवादी इतिहास 'एन्व्हायरमेंटल हिस्ट्री' याचा अभ्यास केला जाणार आहे. सद्यस्थितीत नैसर्गिक हानी जी मानवाकडून होत आहे याची फार महत्त्वाची भूमिका मानवी जीवनात प्रवासात ठरते.

बीज शब्द : पर्यावरणवादी इतिहास

प्रस्तावना :

मानवी कल्याण व विकास हा पर्यावरणाशी संबंधित असतो. इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या भूतकालीन घटनांचा कालक्रम अभ्यासला जातो. इतिहास मानवी घटकांचा अभ्यास करणारी एक ज्ञान शाखा मानली जाते. गतकालीन मानवी जीवनाची माहिती इतिहासा द्वारे होते. प्रागैतिहासिक काळापासून मानवाने जी प्रगती केली त्या प्रगतीचा संबंध बदलत्या पर्यावरणाशी येतो.

'Envormental History and Disaster History' या इतिहासातील नव्याने उदयास आलेल्या ज्ञान शाखा आहेत. नैसर्गिक आपत्ती, भूकंप, दुष्काळ ,चक्रीवादळ, पूर या संकटांनी प्राचीन संस्कृतीचा ऱ्हास झाला याचे इतिहासात दाखले आहेत. उदाहरणार्थ द्वारका नगरीचे अवशेष, ग्रीक बॅबिलोनियन संस्कृती, सिंधू संस्कृती. कोट्यावधी वर्षापूर्वीच्या झालेल्या भौगोलिक बदलाच्या विपरीत परिणामाला तत्कालीन जीवसृष्टी पक्षी, प्राणी जीवजंतू इत्यादी सामोरे जावे लागले.

प्रत्येक काळ मग तो प्राचीन मध्ययुगीन आधुनिक काळात मानवी जीवन व प्राणी जीवनाला नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागले पण सृष्टीच्या नियमाप्रमाणे उत्पत्ती स्थिती व लय याप्रमाणे सृष्टी जीवन व समाज जीवन पुनर्निर्मित झालेले दिसते. प्राचीन संस्कृतीचा उदय आणि विकास हा नद्यांच्या काठीच झालेला आहे. उदाहरणार्थ इजिप्त संस्कृती नाईल नदीकाठी मेसोपोटेमियन टायग्रीस व युफ्रेटिस सिंधू संस्कृती सिंधू रावी नदी या संस्कृतीचा उदय विकास व ऱ्हाससाठी पर्यावरणाची भूमिका महत्त्वाची ठरते.

उद्दिष्टे :

'पर्यावरणवादी इतिहास लेखन एक अभ्यास' यासंदर्भात पुढील उद्दिष्टे ठेवली आहेत.



Scanned with CamScanner

१) पर्यावरण इतिहास म्हणजे काय?
२) पर्यावरण वादी इतिहासाची उत्पत्ती
३) पर्यावरण आणि मानवी संस्कृतीचा परस्पर संबंध
४) बदलत्या पर्यावरणाचा सांस्कृतिक जीवनाचा होणारा परिणाम
५) भविष्यात नैसर्गिक आपत्तीतून इतिहास कालीन संस्कृतिक ठेव्याची जपणूक करण्यासाठी सामाजिक जीवनाची निर्मिती करणे सामाजिक मन तयार करणे

विषयाचे महत्व :

भूतकाळातही या घटना जशा घडल्या त्यांची कारणे महत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न या पेपर मध्ये केला जाणार आहे. पर्यावरण वादी नवीन विचार प्रवाहातून इतिहास व भूगोल संबंध पर्यावरणाचा व सामाजिक व आर्थिक जीवनावर होणारा परिणाम अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाईल.

व्याप्ती व मर्यादा :

शोध निबंधाची व्याप्ती ही पर्यावरणवादी इतिहासलेखन या विचारपुरती मर्यादित आहे.

संशोधनपद्धती :

सादर शोध निबंध अभ्यासतांना दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे.पुस्तके. विविध मासिके,विविध लेख,शासकीय संकेतस्थळाच्या सहाय्याने मांडणी केली आहे.

गृहीतके :

पर्यावरणाच्या बदलाचा मानवाच्या सर्वांगीण जीवनावर परिणाम होतो.

विषय विस्तार :

विसाव्या शतकात युरोपमध्ये अनेक प्रभावशाली कल्पनांचा उगम झाला . इटलीमध्ये मायक्रो हिस्ट्री विकसित झाली तर ब्रिटनमध्ये मानववंश शास्त्रीय सामाजिक इतिहास प्रभावी होता . फ्रान्समध्ये अनल्स दृष्टिकोन विकसित झाला. पर्यावरण इतिहासाने प्रथम आकार घेतला तो संयुक्त राष्ट्रात इसवी सन 1970 ते 1980 च्या दशकात पर्यावरणीय इतिहास क्षेत्रात अमेरिकेने प्रभाव प्राप्त केला इसवी सन 1980 पासूनच पर्यावरणीय इतिहास जगाच्या कानाकोपऱ्यात भरभराटीला आला .

पर्यावरणीय इतिहास एक ज्ञान प्रवाह आहे. या विचार प्रवाहात मानवी आणि सामाजिक संबंधांवर होणाऱ्या परिणामाची चर्चा केली जाते .निसर्ग आणि पर्यावरणातील मानवी संबंधांवर परिणाम करणाऱ्या ऐतिहासिक घटना चा दीर्घकालीन प्रभाव समजून घेण्याचा प्रयत्न या विचारधारेत केला जातो . भूतकालातील पृथ्वीच्या पर्यावरणावर होणारे हे परिणाम आणि त्यामुळे निसर्गात होणारे बदल समजून घेण्याचा एक मार्ग म्हणजे पर्यावरण इतिहास पर्यावरणीय इतिहासकार मानव व त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांच्या बदलाचे मूल्यमापन करतात .उदाहरणार्थ राज्य, राजेशाही. वसाहती चे साम्राज्य, पर्यावरणीय इतिहास केवळ समाज आणि अर्थव्यवस्थेतील बदल पहात नाही तर या बदलांचा नैसर्गिक वातावरण वरील परिणाम चा अभ्यास करते. या बदलत्या घटनाचा ऐतिहासिक घटनाक्रम दर्शवितो. डोनाल्ड कस्टर "द एँड्स ऑफ द अर्थ " या पुस्तकात लिहितात पर्यावरण इतिहास आपल्याला भूतकाळाकडे पाहण्याचा एक नवीन मार्ग देतो आणि या विचारात आपला दृष्टिकोन बदलण्याची क्षमता आहे. पर्यावरणीय इतिहासात मानवी स्थलांतराच्या प्रभावाचा अभ्यास केला जातो.

सामाजिक इतिहास लेखनात इतिहासलेखन क्षेत्रात क्रांती घडवून आणली. विशाल साम्राज्याचा महत्त्वाकांक्षा आणि साम्राज्य विस्ताराच्या योजनेमुळे पृथ्वीच्या वातावरणाची किती हानी झाली हे पर्यावरणी इतिहासावरून दिसून येते . भारतात रामचंद्र गुहा यांनी पर्यावरणाचा दृष्टिकोनातून समाजाचा अभ्यास केला . संस्कृतीच्या वाटचालीत होणारे बदल म्हणजे पर्यावरणाची परिणीती होय. पर्यावरणाचा बदलाने सारे सामाजिक व राजकीय तसेच जैविक संदर्भात बदल होतात.



Scanned with CamScanner

हवामान बदलले सामाजिक स्थित्यंतरे, चालीरीती, खानपानाच्या सवयी ,यातील बदलांचा अभ्यास पर्यावरणी इतिहासात होतो. इतिहासात पूर्वी राजकीय संघर्ष लढाया यांना महत्त्व होते इतिहासात सामाजिक वर्तन हे देखील महत्त्वाचे आहे सामाजिक वर्तन त्याच्या जैविक व घटकांवर व पर्यावरणावर अवलंबून असते भोवतालच्या परिस्थितीवर व्यक्तीचे वर्तन आणि निर्णय प्रक्रिया अवलंबून असते एकाच वेळी माणसे परस्परविरोधी वर्तन करताना दिसतात शांतता निर्माण करण्याची प्रयत्न व दहशतवादी विचार जैविक व अजैविक घटकांमधील प्रक्रियेत सामाजिक इतिहास व सांस्कृतिक इतिहास समजून घेण्यासाठी पर्यावरणवादी दृष्टिकोन असणाऱ्या अभ्यास पद्धती रूढ झाल्या उदाहरणात ध्रुवीय प्रदेश, विषुववृत्तीय प्रदेश यांच्या हवामानाचा तेथील मानवी जीवनावर, संस्कृती, परंपराचा अभ्यास पद्धतीत मोडतो.

मानवी जीवन व भौतिक जग क्षणोक्षणी बदलत असते याचा अभ्यास इतिहासात केला जावा अशा विचार रामचंद्र गुहा यांनी मांडला इतिहासाचा अर्थशास्त्र, समाजशास्त्र ,मानसशास्त्र या विद्याशाखेशी असणारा अन्योन्य संबंध अभ्यासला जातो तसेच निसर्ग शास्त्राचा व इतिहासाचा अतूट संबंध इतिहासकार अभ्यासू लागले. गतकालीन मानवी जीवनाचा सामाजिक स्थित्यंतराचा व विकासाचा अभ्यास प्रकृति विज्ञानाच्या दृष्टिकोनातून इतिहासकार अभ्यासू लागेल. मानव हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे निसर्ग विज्ञान निसर्गातील भिन्न घटक परस्पर संबंधाच्या अध्ययनाचे शास्त्र आहे. जर्मन शास्त्रज्ञ हेकेल १८६६ मध्ये 'इकॉलॉजी' या शब्दाची व्याख्या करताना डार्विनचा 'ओरिजिन ऑफ स्पेसीज' या ग्रंथाच्या संदर्भात हे केलेले विधान म्हणजे डार्विनच्या सिद्धांतानुसार जीवन संघर्षाच्या प्रक्रियेतील सर्व संबंधित घटकांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास म्हणजे परिस्थिती होय.

निसर्गाचा उपयोग मानवी प्रगतीसाठी मानव अनादी काळापासून करताना दिसून येतो. औद्योगीकरण आत्यंतिक नागरीकरण तांत्रिक व वैज्ञानिक विकल्पाने निसर्गाचा अतिरेकी वापरामुळे निसर्गातील संतुलन नष्ट होऊन पर्यावरण दूषित होते यामुळे वनस्पती पक्षी प्राण्यांच्या जाती नष्ट होताना दिसतात या दुष्परिणामामुळे मानवी जीवन ती संपुष्टात येण्याची धोके निर्माण झाले आहे.

१९६२मध्ये श्रीमती रॅचेल कार्सन या अमेरिकन विदुषी पर्यावरणाला धोका दर्शवणारे 'द सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक पर्यावरण चळवळीचा आधार ग्रंथ मानला जातो. निसर्गातील बदलाचा परिणाम मानवी जीवन पद्धतीत होतो उदाहरणार्थ मानवाने वस्तीसाठी डोंगर, झाडी नष्ट केली या मानवी कृतीमुळे निसर्ग बदलला . भारतीय अभ्यासकांनी ऐतिहासिक पुराव्याच्या आधारे पुरातन नैसर्गिक परिस्थितीचे आडाखे बांधले. पुण्याच्या डेक्कन कॉलेज, पुरातत्व विभाग नागपूर विद्यापीठ, पुरातत्त्वशास्त्र प्राचीन मानव जीवन व तत्कालीन नैसर्गिक परिस्थिती यांच्या परस्परावलंबी विषयांवर प्रकाश टाकण्यास उपयुक्त ठरते डॉ. म.के. ढवळीकर यांनी 'पुरातत्त्वविद्या' या ग्रंथात निसर्ग आणि इतिहास यांचा अन्य संबंधाचे स्पष्टीकरण केले प्राचीन इतिहास कालीन काही प्रश्न उत्तरे नैसर्गिक स्थित्यंतरे सापडतात.उदा. सिंधू संस्कृतीचा अंत आणि सरस्वती नदीचा ऱ्हास या प्रश्नांची उत्तरे नैसर्गिक स्थितीत शोधली जातात सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे सांगताना नैसर्गिक कारणे शोधली तर आर. एल. रेक्स यांनी वॉटर वेदर अँड प्री हिस्टरी या ग्रंथात व्यक्त केली आहेत. सिंधू नदीच्या महापुरामुळे मोहनजोदडो शहर नष्ट झाले .पण हा पुर अतिवृष्टी मध्ये मुळे नव्हे तर भूकंपाने झाल्याचे मत . रेक्स मांडले आहे. सरस्वती नदीच्या ऱ्हासाचे कारण रेक्स देताना म्हणतात इ.सवी. पूर्व तिसऱ्या सहस्रकात यमुना नदीचे पाणी सरस्वती नदी पडायचे, पण ते इसवी सन पूर्व दुसऱ्या सहस्रकात ते गंगा नदीत पडू लागले, त्यामुळे ही नदी लुप्त झाली. बदलते नद्यांचे प्रवाह, जंगलतोड इत्यादीमुळे जल जीवनात बदल झाला.

ऐतिहासिक साहित्य, वैदिक ,साहित्य, पुराणग्रंथ, महाकाव्यात देखील प्राणी जीवन व मानवी जीवनात या बाबतचे उल्लेख आढळतात यावरून नैसर्गिक परिस्थितीचा अंदाज येतो.



Scanned with CamScanner

एकंदरीत मानवी जीवनाच्या निसर्गाचा अति निकट संबंध येतो बदलत्या नैसर्गिक परिस्थिती चा मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासतांना निसर्गाची हानी मानवाचे जीवन विस्कळीत करताना दिसून येते. त्यामुळे निसर्ग संवर्धन व रक्षणाची महत्त्व मानवाला समजावे यासाठी अनेक संस्था प्रयत्न करताना दिसतात चिपको आंदोलनाचे प्रवर्तक सुंदरलाल बहुगुणा यांनी ही निसर्गाच्या रक्षणासाठी व संवर्धनाच्या विचाराचा प्रभावीपणे विचार मांडला आहे.

ज्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे विशेषता उत्खलीत साधने ज्या वस्तू वास्तू यांचा समावेश होतो ती ऐतिहासिक साधने जपण्याची संवर्धनाची गरज आहे. कारण या वस्तू वास्तू नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट होतांना दिसून येतात. याबाबत सामाजिक मन व सामाजिकजाणीव निर्माण करणे महत्त्वाचे ठरते. नैसर्गिक बदलाला जसा मानव कारणीभूत आहे तसेच मानवी जीवन प्राणीजीवन निसर्गाचे रक्षण व संवर्धन करणे हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, म्हणून इंग्लंडमध्ये एन्व्हायरमेंट अँड हिस्ट्री या नावाचे नियतकालिक जॉन क्लॉक व पीटर कोटस यांनी संपादन केले आहे. भारतातही रामचंद्र गुहा सारखे इतिहासकार या दृष्टिकोनातून लिखाण करतांना दिसून येतात.

पर्यावरणासंबंधीच्या बदलांचा विचार करताना स्थानिक बदल महत्त्वाचे असतात. पर्यावरणाच्या अभ्यासात भूशास्त्र, पुराजीवशास्त्र, हवामानशास्त्र, सागरविज्ञान, इतिहास व पुरातत्त्व शास्त्रचा उपयोग होतो. पर्यावरणीय इतिहास लेखनातून स्थानिक बदलाबरोबर जागतिक पातळीवर होणाऱ्या बदलांचा विचार केला जातो.

प्रादेशिक इतिहास लेखनात देखील प्रादेशिक पर्यावरणीय बदलाचा इतिहास लिहिला जाऊ शकतो. उदा. महाराष्ट्राचे प्रागैतिहासिक पर्यावरण यांच्या अभ्यासात दख्खन पठाराची झालेली निर्मिती. दख्खन पठाराच्या निर्मितीची प्रक्रिया सात कोटी वर्षापूर्वी सुरू झाली. या प्रक्रियेत कार्बन डायॉक्साईड वातावरणात मिसळला थंड झालेल्या लाव्हारसामुळे दख्खन पठार निर्माण झाले. कार्बन-डाय-ऑक्साईड ची वाढ मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे आणि भारतीय द्वीपकल्पाच्या उत्तर गोलार्धात सरकल्यामुळे तेथील हवामानात व पर्यावरणात बदल घडून आला. तप्त लाव्हारसाखाली आधी अस्तित्वात असलेले प्राणीजीव व वनस्पती नष्ट झाल्या ,कार्बनडाय ऑक्साईडच्या वाढत्या प्रमाणामुळे तापमानात वाढ झाली.

नैसर्गिक शेती व गतकालीन मानवी जीवन म्हणजेच इतिहास यांचा परस्पर प्रभावाचा अभ्यास करताना, मानवी जीवनाचे स्वरूप नैसर्गिकस्थिती ठरविते उदा.सतत होणाऱ्या भूकंपामुळे जपानमध्ये लाकडाची व बांबूची घरे बांधतात.

डॉ.शिरीन मुसावी यांनी Man and Nature in Mughal India या ग्रंथात नैसर्गिक परिस्थितीने मोगल काळात जीवन पद्धती आणि आर्थिक व व्यापारी व्यवहाराचे बदलते स्वरूप स्पष्ट केले आहे. या संदर्भात एक उदाहरण म्हणजे गोवळकोंड्याच्या नजीकच्या जंगलात बकऱ्यांच्या पोटात मिळणारा Bezoar नावाचा मौल्यवान खडा. या बकऱ्यांना वेगळया जंगलात स्थलांतरित केल्यानंतर तो मिळत नव्हता.

नैसर्गिक शेतीचा मानवी जीवनात प्रमाणेच सर्वच प्राणी मार्गावर प्राणीमात्रावर परिणाम होतो याचाही अभ्यास पर्यावरणीय इतिहास लेखनात करता येतो.प्राचीन काळातील घराच्या बांधकामावरून साहित्यावरून येथील हवामानाचा व वस्ती चा वस्ती ची माहिती मिळते मानवी पशूच्या सांगण्यावरून त्याचे स्थलांतर अभ्यासता येते.

निष्कर्ष :

या नवा प्रवाहातून खालील निष्कर्ष काढता येतील.



Scanned with CamScanner

Vol.2 Issue-13 ISSN – 2347-7075

१.पर्यावरणाच्या रक्षणातून संस्कृतीची जपणूक होते.
२. इतिहासलेखनातील हा नवा विचार सामाजिकशास्त्रे व विज्ञानाशी सांगड घालतांना दिसतो.
३.या दृष्टीकोनातील इतिहासलेखन सर्वांगीण इतिहास लेखन ठरते.
४.आजही आदिवासी समाजजीवन निसर्गाशी जोडून आपली संस्कृती जपतांना दिसते.
५.बदलत्या ग्रामीण व नागरी समाजाच्या अभ्यास करता येतो.
६.ऐतिहासिक ठेवा जो वस्तू व वस्तूच्या स्वरुपात आहे.याची बदलत्या पर्यावरणामुळे होणारी हानी कशी टाळता येईल यासाठी समाजात जागरुकता निर्माण केली जाऊ शकते.
७.निसर्ग जगाला तर मानवी समाज जगू शकतो हा संदेश या पर्यावरणवादी दृष्टीकोनातून देता येतो.

संदर्भ साधने :

१. J.R.Nell-Intercultural center (ICC), Geogetown University, Washington D.C.
२.कोठेकर शांता इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर.
३.देव प्रभाकर इतिहासलेखनशास्त्र,
४..Guha Ramchandra –Envioronmentalism A Global History.
५..Institute of Historical Studies: 2018 page No.166, 67 kolkata.
६.Roy Tirthankar,' Natural Disasters and Indian History'.
७.ढवळीकर म.के.,राज्यसाहित्य संस्कृती, महाराष्ट्र,१९७९,मुंबई.
८.महाराष्ट्र इतिहास आणि संस्कृती, पर्यालोचन भारतीय इतिहास संकलन समिती,महाराष्ट्र,पुणे पान.न.१२
९.पवार जयसिंगराव,विज्ञान,तंत्रज्ञान आणि प्रगती, फडके प्रकाशन कोल्हापूर.





Scanned with CamScanner